स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

"धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती : एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ - हिंगोली जिल्हा)"

★ संशोधक ★

संदिप भिमराव कुऱ्हाडे

एम. ए. (राज्यशास्त्र), एम. फिल., सेट

★ मार्गदर्शक ★

प्रा.डॉ. सुखनंदन ढाले

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

★ संशोधन केंद्र ★

पीपल्स कॉलेज, नांदेड

मार्च - २०२२

संशोधन आराखडा

"धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती : एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ - हिंगोली जिल्हा)"

प्रस्तावना (Introducion)

भारतामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा व संस्कृती अस्तीत्वात असल्यामुळे त्याची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनपध्दती ही वेगवेगळी आहे. या सर्व जातीमध्ये धनगर ही जात अतिशय प्राचीन असून ती एक आदिवासी वन्य जात म्हणून सुध्दा संशोधनाव्दारे सिध्द होत आहे. सिंधु संस्कृतीमध्ये मेंढपाळाचा उल्लेख असल्याचे आढळून येते. इतिहासामध्ये ३६ मुळ ऋषीपैकी ताप हा धनगर जातीचा असल्याचे मानण्यात येते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातमध्ये सुध्दा अनेक धनगर जमातीतील व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा उमटवलेला आहे.

मानवी जीवनाच्या आरंभापासून धनगर ही जमात अस्तीत्वात होती. प्राचीन भारताच्या इतिहासाचे अवलोकन केल्यास आपणास धनगर समाजातील अनेक राजे व सम्राट होऊन गेल्याची नोंद आहे. परंतु इतिहासकारांनी धनगरांच्या इतिहासावर प्रकाश टाकलेला नाही असे दिसून येते. प्राचीन भारताच्या इतिहासात पहिला सम्राट म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो तो चंद्रगुप्त मौर्य हा धनगराचा वंशज होता. इ.स.पूर्व काळापासून धनगरांचा उल्लेख पहायला मिळतो. वेदाच्या चारही भागात धनगराचा उल्लेख आलेला आहे.

धनगर समाजाच्या उत्पत्तीसंबंधात अनेक मतभेद आहेत. धनगर जमातीच्या देवकावदून हे लोक मुळचे अनार्य असावे असे मत काही तज्ञांनी मांडले आहे. संस्कृत भाषेतील धांग म्हणजे डोंगर किंवा पर्वत, डोंगरावर राहणारे लोक म्हणजे धनगर अशी धनगर समाजाची ओळख दाखवल्या जाते. सिंधु संस्कृतीत मेंढ्यांचा उल्लेख आलेला आहे. म्हणजे आर्य येण्याअगोदर पशुपालन हा व्यवसाय द्रविडाचा होता म्हणून मेषपालक द्रविडीयन हा धनगर असल्याचा उल्लेख इतिहासात दिसतो. इंग्रजी सत्तेला भारतातून हाकलून देण्याचे कार्य सर्वप्रथम यशवंत होळकरांनी केल्याचे दिसते. यशवंतरावांची कन्या भिमाबाई होळकर यांनी इंग्रजाविरुध्द युध्द पुकारुन अनेक युध्दात धुळ चारली व भारताची आद्य महिला क्रांतीकारक म्हणून इतिहासात अजरामर झाली.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत एखादी जात किंवा जात समूह, जमात हे राजकीय, सामाजिक आधार बनलेले आहेत. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातही जातीने आपआपल्या संस्था स्थापन केल्या आहेत. त्यामुळे आज भारतीय लोकशाही व्यवस्थेत जातीव्यवस्था ह्या पूर्वी कधीही इतक्या सामर्थ्यशाली नव्हत्या तेवढ्या आज सामर्थ्यशाली दिसून येतात. भारतामध्ये सर्वच राज्यामध्ये वेगवेगळ्या नावाने धनगर जमात अस्तित्वात असल्याचे दिसते. आणि त्याचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनही काही प्रमाणात सारखेच असल्याचे आढळते. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात ही जमात कमी अधिक प्रमाणात आढळून येतो. महाराष्ट्रात धनगर जमातीच्या अनेक उपजमाती आहेत. त्या प्रत्येक जिल्ह्यात विस्तारलेल्या आहेत आणि त्या अजुनही स्थायिक झाल्याचे दिसत नाही. आपल्या मेंढपाळ व्यवसायाच्या माध्यमातून त्या स्थंलातरीत होत असतात. त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख स्त्रोत शेळयामेंढ्या पालन, शेती हा आहे.

भारतीय राजकारण व समाजकारणामध्ये जात / जमात हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. त्याला महाराष्ट्र अपवाद नाही. महाराष्ट्रात मराठा समाजाच्या खालोखाल धनगर जमातीची लोकसंख्या आहे. परंतु त्या प्रमाणात या जमातीला राजकारणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही. धनगर जमातीचे राजकीय सामाजिकरण झालेले नाही. कारण त्यांच्यातील जे राजकीय पुढारी हे कोणत्यातरी राजकीय पक्षाभोवती आपली भूमिका बजावतात. प्रत्यक्ष राजकारणात त्याचा अल्पसा सहभाग दिसतो. महाराष्ट्रातील राजकारणात धनगर जमातीचे प्रभावी नेतृत्व निर्माण झालेले नाही. तसेच आजही ही जमात रानावनात राहते तसेच गावात धनगर वस्तीमध्ये असल्याचे दिसते. या जमातीत शिक्षणाचे प्रमाण हे ४८ टक्केच्या वर गेलेले नाही व त्यात मुलीचे शिक्षणाचे प्रमाण हे २२ ते २५ टक्क्यापर्यंत इतके मर्यादीत आहेत.

आर्थिक दृष्टीने धनगर ही जमात अतिशय मागास आहे. रोजगार निर्मितीसाठी त्यांना नेहमी भटकंती करावी लागते. अस्थीर जीवन, राजकीय जाणीव जागृतीचा अभाव, शिक्षणाचा अभाव यामुळे महाराष्ट्रातील धनगर जमात राजकारणापासून दूर राहिलेली आहे व राजकारणातील सहभाग तुलनेने कमी आहे.

हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती पाहिल्यास हिंगोली जिल्हयातील पाचही तालुक्यात धनगर जमात व तिच्या पोटजमाती असल्याचे दिसते. ही जमात हिंदू धर्माचे पालन करत असल्याचे दिसते. त्यातील देवदेवता तसेच विरोबा,

खंडोबा हे त्याचे कुलदैवत आहे. ही जमात आजही हिंगोली जिल्ह्यात सामाजिकदृष्ट्या मागास आहे. यांच्यात शिक्षणाचे प्रमाण त्यांना रोजगाराच्या सोयी उपलब्ध नाहीत व त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हिंगोली जिल्ह्यातील काही धनगर जमात हा ऊसतोड कामानिमित्त आजही स्थलांतरीत होतांना दिसतो. त्यामुळे त्याच्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो.

हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक राजकारणात या धनगर जमातीला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळत नाही. जनतेत राजकीय जागृती झालेली नाही. एकंदरीत ह्या हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

समस्या सुत्रण (Research Problem)

संशोधन क्षेत्रात अध्ययन करत असताना संशोधकाला सुरवातील समस्या विषय निवडणे आवश्यक असते. त्याशिवाय संशोधनाला सुरुवात करता येत नाही. त्यामुळे संशोधनकामी महाराष्ट्रातील आणि विशेषत्वाने हिंगोली जिल्ह्यातील धनगर या जमातीतील सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्या आहेत. बेरोजगारी, सामाजिक मागासलेपणा, प्रथा पंरपराचे प्रभाव, रोजगारासाठीचे स्थलांतरण या सर्व समस्यांचा त्यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन पध्दतीवर परिणाम झाला आहे. धनगर जमातीमधील राजकीय मागासलेपणाची कोणती कारणे आहेत. घटनेत धनगर समाजासाठी कोणत्या तरतुदी आहेत. तसेच या समाजाविषयी शासनाचे नेमके धोरण काय आहे या सर्व समस्याचा उलगडा करण्याच्या दृष्टीने संशोधनाअंती आलेली माहिती शासनाला सादर करण्यासाठी संशोधकाने संशोधन समस्या म्हणून **"धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती : एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)"** या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Research)

इ.स.पूर्व काळापासून भारतामध्ये धनगर जमातीचा उल्लेख असल्याचा आपल्याला पाहायला मिळतो. ही जमात प्रामुख्याने रानावनात डोंगरदऱ्यात वास्तव्यास असून पशुपालन हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असल्याचे आढळते. मध्ययुगीन कालखंडात धनगर जमातीनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. परंतु नंतरच्या काळात ही जमात राजकीय व सामाजिक व्यवस्थेपासून दूर (अलिप्त) असल्यासमुळे ते उदरनिर्वाहासाठी रानावनात आपला पारंपारिक

व्यवसाय करत असल्याचे दिसुन येते. अलिकडचा काळ बघितला तर या जमातीचे मुलभूत प्रश्न सुध्दा सुटत नसल्याचे दिसतात. धनगर जमात राजकारण, अर्थकारण व समाजकारणात मागासलेली आहे. आजही महाराष्ट्रातील आणि विशेषत्वाने हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमात विकासाच्या प्रवाहात आलेली नाही व आपल्या पारंपारिक व्यवसायातून कसातरी उदरनिर्वाह करतांना दिसते. या जमातीत शिक्षणाचे प्रमाण अल्प असल्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. हिंगोली जिल्ह्यातील धनगर समाजात राजकीय जागृती नाही. त्याचे राजकारणातील स्थान अतिशय नगण्य असून एकंदरीत या समाजातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी व धनगर ही जमातीतील मागासलेपणाच्या समस्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने संशोधन विषयाचे महत्व राहणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives)

प्रत्येक संशोधनाचे उद्दिष्ट्ये किंवा हेतू हा ज्ञानाची वृध्दी करणे हा असतो. मुळातच संशोधन हे ज्ञानवृध्दीचे साधन आहे. प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन करण्यासाठी काही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत. कारण उद्दिष्टाशिवाय कोणत्याही संशोधन कार्याची पूर्तता होऊ शकत नाही. प्रस्तुत संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) हिंगोली जिल्हयाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विकास जाणून घेणे.

२) धनगर जमातीचा पुर्वइतिहास जाणून घेणे.

३) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

४) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची आर्थिक स्थिती जाणून घेणे.

५) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची राजकीय स्थिती अभ्यासणे.

६) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीमधील राजकीय जागृततेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis)

सामाजिक संशोधन करीत असताना काही गृहितकृत्ये समोर ठेऊनच संशोधन केले जाते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी काही गृहितके समोर ठेवण्यात आली आहेत व त्या गृहितकाच्या आधारावर संशोधन कार्य पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला जातो ते गृहितके खालीलप्रमाणे आहेत.

१) हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रातील मागास जिल्हा आहे.

२) धनगर जमात ही पशुपालन व पारंपारिक शेती करणारी प्राचीन जमात आहे.

३) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमात सामाजिकदृष्ट्या मागासलेली जमात आहे.

४) हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख जमात असुन आर्थिकदृष्टया मागास आहे.

५) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीचे राजकीय प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या तुलनेत कमी आहे.

६) हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीमध्ये राजकीय जागृततेचा अभाव आहे.

अभ्यासक्षेत्र किंवा व्याप्ती (Area of Study)

संशोधन कार्य पूर्णत्वास आणण्यासाठी व त्याला निश्चित दिशा देण्यासाठी आणि संशोधनात स्पष्टता व नेमकेपणा आणण्याच्या दृष्टीने संशोधनाचे क्षेत्र किंवा व्याप्ती निश्चित करणे आवश्यक असते. "**धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती: एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा)**" या प्रस्तुत अध्ययन विषयाची व्याप्ती ही हिंगोली जिल्ह्यापुरती मर्यादीत करण्यात आली आहे. धनगर जमात ही प्रमुख जमात असुन त्याच्या विविध पोटजमाती आहेत. प्रस्तुत अध्ययन विषयात धनगर जमातीमधील सर्व पोटजमातीचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology)

"महाराष्ट्रातील धनगर जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती : एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ: हिंगोली जिल्हा)" या संशोधन विषयाचे अध्ययन करत असताना सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला जाणार आहे. प्रस्तुत विषयातील संशोधन संख्यात्मक स्वरुपाचे आहे.

नमुना निवड (Sample method)

गुड आणि हॅट यांच्या मतानुसार "नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी आहे." प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन करण्यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्याचा समावेश आहे. तसेच प्रत्येक तालुक्यातील ०७ (सात) गावाची नमुना निवडीसाठी निवड करण्यात येणार आहे. असे एकूण ३५ गावे निश्चित करण्यात येतील आणि प्रत्येक गावातुन १० उत्तरदात्याची निवड ही नमुना निवडीसाठी करण्यात येईल. असे एकुण

हिंगोली जिल्ह्यातील ३५० उतरदात्यांची निवड संशोधन अभ्यासासाठी नमुन्याच्या स्वरुपात करुन ० संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक तथ्य संकलन पध्दती मधील मुलाखत अनुसुची व निरीक्षण या तंत्राचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

द्वितीयक तथ्य संकलन तंत्राचा सुध्दा अवलंब तथ्य संकलनासाठी केला आहे. यामध्ये ग्रंथ, अहवाल, शासकीय अधिनियम व अध्यादेश, नियतकालिके, वृतपत्रे अशा सर्व प्रकाशित व अप्रकाशित लिखीत सामुग्रीचा समावेश होतो. यामधुन प्रस्तुत विषयाशी संबंधीत महत्वपुर्ण माहिती व आकडेवारीचा उपयोग केला आहे.तथ्य संकलानाच्या प्राथमिक, द्वितीयक तंत्राचा उपयोग करुन प्रस्तुत संशोधनाच्या उद्देशाप्रत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे.

तथ्य विश्लेषण (Data Analysis)

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संकलीत प्राथमिक तथ्याचे संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण करण्यात आले आहे. वर्गीकृत तथ्यांचे सारणीकरण करुन विश्लेषण करण्यात आले आहे. तसे द्वितीयक तथ्य संकलन तंत्राच्या आधारे संकलित केलेल्या तथ्याचे व्यवस्थित विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

संशोधन साहित्याचा आढावा (Review of Literature)

"धनगर जमातीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास: एक विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ- हिंगोली जिल्हा)" या संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी संदर्भग्रंथ, शासकीय दस्तऐवज, पुस्तके अशा साहित्याचा आधार घेण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन आराखड्यासाठी काही संदर्भग्रंथाचा व पुस्तकाचा अभ्यास केला आहे. या संशोधनाचे वेगळेपण जपण्यास खालील पुर्व संशोधन साहित्याचे अवलोकन महत्वपुर्ण ठरले आहे.

१) संजय सोनवनी यांनी आपल्या 'धनगराचा गौरवशाली इतिहास' या ग्रंथात प्राचीन मध्ययुगीन व स्वातंत्र्य लढ्यात धनगर नेतृत्वाने केलेल्या कार्याची माहिती मांडली आहे.

२) डॉ. प्रभाकर लोंढे यांनी धनगराची राजकीय दुरावस्था या ग्रंथात धनगर समाजाचे लोकसंस्कृती, लोकगिते, धनगर समाजाची उत्पत्ती, सामाजिक व राजकीय स्थितीचे वास्तववादी चित्रण रेखाटले आहे.

३) बी.आर. काळे यांनी लोकमाता आहिल्याबाई होळकर या ग्रंथात अहिल्याबाईच्या असामान्य धाडशी नेतृत्वाची व त्यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

४) रामकृष्ण घुटूकडे यांनी मी आणि माझा धनगर समाज या पुस्तकात धनगर समाजाचा इतिहास व राजकारणावर आपले विचार मांडलेले आहेत.

५) नेवरकर पांडुरंग यांनी धनगर समाजातील आमदाराचा महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजातील सहभाग: एक चिकित्सक अभ्यास या संशोधनात त्यांनी महाराष्ट्रातील धनगर समाजातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केलेला आहे व विधिमंडळातील त्यांच्या सहभागासंबंधी माहिती दिलेली आहे.

संशोधन प्रकरणाची रुपरेषा

प्रस्तुत संशोधन विषयाचे पैलु लक्षात घेऊन अभ्यासाकरीता प्रकरण मांडणी सात प्रकरणामध्ये केलेली आहे. ती पुढील प्रमाणे

प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधनपध्दती

प्रकरण दुसरे - हिंगोली जिल्हा एक दृष्टीक्षेप

प्रकरण तिसरे - धनगर जमातीचा पुर्वइतिहास

प्रकरण चौथे - हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीचे सामाजिक जीवन

प्रकरण पाचवे - हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची आर्थिक स्थिती

प्रकरण सहावे - हिंगोली जिल्ह्यातील धनगर जमातीची राजकीय स्थितीचे अध्ययन

प्रकरण सातवे - सारांश, निष्कर्ष व शिफारशी

● **संदर्भ ग्रंथसूची**

अ. मराठी ग्रंथ

१) अनुसे, नितीनराजे, (२०१८), पुन्हा एक नवी दिशा, सांगली, राजे प्रकाशन.

२) कऱ्हाडे, डॉ. बी.एम., (२००७), शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपुर, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.

३) काळे , बी.आर., (२०१६), लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, औरंगाबाद, संदर्भ प्रकाशन.

४) कुंभार, नागोराव, (संपादक), (२०१५), विचारशलाका, पुणे, नर्मदा ऑफसेट.

५) केशरी, नागेश, (संपादक), (२०१३), महाराष्ट्र विधानसभा सदस्यांची आडनावानुक्रमे यादी (सन १९३७ ते २०१३), मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, विधान भवन.

६) कोकणे, प्र.ना., (२०११), महाराष्ट्रातील धनगर अनूसुचित जमात (एस.टी.), पुणे, श्री समर्थ पिंटर्स.

७) कोळेकर, हरिभाऊ, (२०१४), 'धनगरांचे राजकारण', बार्शि (जि. सोलापुर), अहिल्या प्रकाशन.

८) खडपेकर, विनया., (२०१०), ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर, पुणे, राजहंस प्रकाशन.

९) खेडेकर, पुरुषोत्तम, (२०११), लोकमाता अहिल्यादेवी होळकर, पुणे, जिजाई प्रकाशन.

१०) गवते, ज्ञानेश्वर, (२०११), धनगरांच्या लोकसाहित्यातील समाजदर्शन, औरंगाबाद, श्री कैलास पब्लिकेशन.

११) गव्हाणे, डॉ. अजय (२०१४), संसदीय लोकशाहीची आयुधे, नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन.

१२) गिरमे, के.टी., (१९८३), विधानसभा परिचय आणि कामकाज, व्दितीय आवृत्ती पुणे, विद्या प्रकाशन.

१३) गोरे, शिवाजी, (२०१३), अण्णासाहेब डांगे यांचे महाराष्ट्रातील राजकारण व धनगर समाज सुधारणेतील योगदान: एक अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एम.फिल. करीता सादर शोधप्रबंध.

१४) घुटूकडे , रामचंद्र, (२०१७), 'मी आणि माझा धनगर समाज', पुणे, यशोदीप प्रकाशन.

१५) घोडाळे, रा.ना., (२००९), समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, नागपुर, मंगेश प्रकाशन.

१६) घांगरेकर, चि.ग., (१९९९), आधुनिक राजकीय विश्लेषण, नागपूर, विद्या प्रकाशन.
१७) चव्हाण, रामनाथ, (२००८), भटक्या विमुक्तांची जातपंचायत, खंड-४, पुणे, देशमुख ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.
१८) जाधव, गंगाधर, (२००९), कॉ. विठ्ठलराव नाईक यांच्या कार्याचे राजकीय विश्लेषण: एक अभ्यास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, एफ.फील. पदवीकरीता सादर शोधप्रबंध.
१९) जाधव, तुकाराम, महेश, शिरापूरकर (२०११), भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, पुणे, नर्मदा ऑफसेट.
२०) जानकर, महादेव, (२००९), बदल आम्ही घडविणार, मुंबई, यशवंत नायक प्रकाशन..
२१) जोशी शं.बा., मराठी संस्कृती काही समस्या.
२२) दळणर, शिवाजी, (२००३), परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पीएच.डी. पदवीकरीता सादर शोधप्रबंध.
२३) दिक्षित, दुर्गा (२००९), महाराष्ट्र संस्कृतीकोष, प्रथमावृत्ती, पुणे, डायमंड पब्लिकेशन.
२४) नाईकवाडे, अशोक, नलावडे पंडित, (२०१३), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन.
२५) पवार, डॉ. प्रमोद, पाटील महेंद्र, (२०१५), आधुनिक राजकीय विश्लेषण, जळगांव, प्रशांत पब्लिकेशन.
२६) पळशीकर सुहास, (२०१३), राजकारणाचा ताळेबंद, पुणे, साधना प्रकाशन.
२७) पाटील, बी. बी ., (१९९९), भारतीय शासन आणि राजकारण, कोल्हापूर, कडवे प्रकाशन.
२८) फुलारी, रा. ना., (२०१४), महाराष्ट्र विधिमंडळ कार्यभाग, नागपूर अधिवेशन (१९९५ ते २००३), अमरावती, मुद्रा प्रकाशन.
२९) बनसोडे, माधव, (२०१३), महायौध्दा मल्हारराव होळकर, नांदेड, निर्मल प्रकाशन.
३०) बारिंगे, श्रीकांत, (२०१५), 'क्रांतीची मशाल पेटवा', नागपुर, ब्ल्यू कॅनॉन पब्लिकेशन
३१) भुजाडे, होमेश, (२००५), 'धनगर समाज आणि परिवर्तन,' नागपूर, सुधीर ग्राफिक्स.
३२) माने, उज्वलकुमार, (२०१०), रणरागिनी अहिल्यादेवी, पुणे, यशोदीप पब्लीकेशन.

३३) मिसाळ, अनिल, (२०१६), रणझुंझार महाराजा यशवंतराव होळकर, जत, ज्ञानकुंज प्रकाशन.

३४) मोरे, विठ्ठल., सोलापुरे, राजशेखर., इतर, (२०१०), महाराष्ट्र शासन आणि राजकारण, लातूर, अरुणा प्रकाशन

३५) येडेकर, श्याम, (२०१३), मी धनगर, कोल्हापुर, राधिका एंटरप्राईजेस.

३६) लोंढे, डॉ. प्रभाकर, (२०१६), 'धनगरांची राजकीय दुरावस्था', नागपुर, सिरली ग्राफिक्स.

३७) लोंढे, डॉ. प्रभाकर, (२०१६), कुरमार : दक्षिण भारतीय धनगर जमात, नागपरू, त्रिवेणाई प्रकाशन.

३८) शूरनर, गोविंदराम, (२०१५), 'आद्य क्रांतीकारी राजे यशवंतराव होळकर,' नांदेड, अहिल्या प्रकाशन.

३९) सुमंत, डॉ. यशवंत, पुंडे, डॉ. दत्तात्रय (संपादक), महाराष्ट्रातील जातीव्यवस्था विषयक विचार.

४०) सोनवणी, संजय, (२०१५), धनगरांचा गौरवशाली इतिहास, पुणे, पुष्प प्रकाशन.

४१) सोनवणी, संजय, (२०१६), महाराजा यशवंतराव होळकर,पुणे, पुष्प प्रकाशन.

आ. हिंदी ग्रंथ

१) खन्ना, डॉ. कैलास, (२००४), आधुनिक भारत का सामाजिक इतिहास, नई दिल्ली, अर्जन पब्लिशिंग हाऊस.

२) मतकर, डॉ. गणेश,शं., (१९९४) इंदौर का क्षत्रिय समाज: एक अध्ययन, शोधपुस्तिका.

३) मधुसुदन होळकर, होलकरों का इतिहास, नई दिल्ली, होलकर संघ.

इ. इंग्रजी ग्रंथ

१) Hassan, S.S., (1920), Dhangar, the Caste and Tribes of H.E.M. the Nizam Dominion, Bombay.

२) Irawati, Karve, (1951), Dhangar Anthropometrice measurements of Maharashtra, Pune.

३) Varma, S.L., (1989), Research Methodology in Political Science, Jaipur, Rawat Publication.

ई शासकीय अहवाल

१) महाराष्ट्र विधानसभा नियम (२०१४), अकरावी आवृत्ती, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, मुंबई.

२) मानव विकास अहवाल, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल.

उ. मासिके व साप्ताहिके

१) परिवर्तनाचा वाटसरु

२) पिवळं वादळ

३) अहिल्या ज्योत.

४) योजना

५) लोकराज्य

६) समाज प्रबोधन पत्रिका

ऊ. वर्तमानपत्रे

१) महाराष्ट्र टाईम्स

२) लोकमत

३) सकाळ

४) देशोन्नती

ए. वेबसाईट

1) www.election.in

2) www.maharashtra.gov.in

3) www.shodhganga.inflibent.ac.in

संशोधक

संदिप भिमराव कुऱ्हाडे

एम. ए. (राज्यशास्त्र), एम. फिल., सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सुखनंदन ढाले

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली